जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियता

डॉ. गणेश सुर्यवंशी (CHB)**राज्यशास्त्र विभाग,बलभीम कला, विज्ञान, आणि वाणिज्य महाविद्यालय, बीड.**

प्रस्तावना :

भारतीय संघराज्यात भारतीय राज्यघटनेच्या वैशिष्ट्यानुसार एकेरी व्यवस्था आहे. संघराज्यात केंद्र सरकार आणि घटकराज्ये यामध्ये अधिकार विभागणीबाबत संघर्ष निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संघराज्यात न्यायपालिकेचे स्थान विशेष महत्वाचे आहे. सन 1935 **च्या कायद्यानुसार भारतात फेडरल कोर्ट ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूध्द भारतीय संघ न्यायालय** (Federal Coart of India) **कडे अपील करता येत असे संघीय न्यायालयाच्या निर्णयावर अपील ऐकण्याचा अधिकार इंग्लंडच्या प्रिव्ही कौन्सिलला होता आणि तिचा निर्णय अंतिम** (FInal) **होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र** Federal cout of India **च्या जागी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने नियंत्रण भारतातील सर्व न्यायालयांवर आहे. त्याचप्रमाणे प्रिव्ही कौस्निलचा पुनर्निर्णयाचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास प्राप्त झाला आहे.**

भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या सहाव्या भागात कलम 124 **ते** 146 **मध्ये तसेच कलम** 214 **ते** 236 **मध्ये न्यायदान व्यवस्थेची तरतूद करण्यात आलेली आहे. भारतात एकेरी न्यायदानपद्धती आहे. मध्यवर्ती व घटक राज्याची अशी वेगवेगळी न्यायालये आपल्याकडे नाहीत. आपल्या देशात संघराज्यात्मक स्वरूपाची शासनपध्दती स्वीकारलेली असली तरी अमेरिकेच्या दुहेरी न्यायदान व्यवस्थेचा आपण स्वीकार केलेला नाही. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये, कनिष्ठ न्यायालये अशी एकेरी किंवा एकात्मक स्वरूपाची न्यायव्यवस्था आपल्या देशात निर्माण करण्यात आलेली आहे. आपल्या न्यायव्यवस्थेची रचना एखाद्या पिरॅमिड प्रमाणे आहे. भारतीय न्यायव्यवस्थेची रचना पुढील प्रमाणे आहे.**

सर्वोच्च न्यायालय (सरन्ययाधीय व सहायक न्यायाधीश)

↓

उच्च न्यायालय (मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश)

↓

कनिष्ठ न्यायालय (जिल्हा व सेशन न्यायाधीश)

↓

दिवाणी	**फौजदारी**
सिव्हिल जज्ज (सिनियर डिव्हिजन) ↓	**मॅजिस्टेट वर्ग** 1 ↓
सिव्हिल जज्ज (ज्युनियर डिव्हिजन) ↓	**मॅजिस्टेट वर्ग** 2 ↓
स्मॉल कॉजेस कोर्ट	**मॅजिस्टेट वर्ग** 3

भारताच्या न्यायव्यवस्थेची वैशिष्ट्ये : आमच्या घटना परिषदेने सर्वोच्च न्यायालयाच्या संदर्भात एक तात्पुरती समिती स्थापन केली होती. या समितीने असे मत व्यक्त केले की, भारतीय न्यायव्यवस्था इतर देशांतील न्यायव्यवस्थेच्या थोडी अधिक व्यापक स्वरूपाची असावी. समितीने भारतीय न्यायव्यवस्थेच्या कार्यरचना आणि अधिकाराबाबत महत्त्वपूर्ण सूचना केल्या होत्या आणि त्यातील बहुतेक स्वीकारल्या गेल्या. या सूचनांवरून एक निष्कर्ष असा निघतो की, अंतिमत: जरी आपण संघराज्य पद्धतीचा स्वीकार केला असला, तरी ब्रिटिशांनी सुरू केलेल्या न्यायप्रशासनामुळे दुहेरी न्यायव्यवस्था निर्माण करून अमेरिका आणि ऑस्ट्रेलियातील न्यायव्यवस्थेचे आधुनिकीकरण टाळून संघराज्याच्या परंपरेला अनुसरून वैशिष्ट्यपूर्ण अशा एकेरी न्यायव्यवस्था स्वीकारण्यात आली. भारतीय न्यायव्यवस्थेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

1. एकेरी न्यायव्यवस्था :- भारतात प्रशासकीय बाबतीत जरी केंद्र आणि संघराज्य असा प्रकार आढळून येत असला तरी न्यायव्यवस्थेच्या बाबतीत घटनेनुसार मात्र एकेरी न्यायव्यवस्थाच निर्माण झालेली दिसते. एकेरी न्यायव्यवस्था स्वीकारण्याची काही कारणे आहेत. राज्यघटनेत जी कामाची वाटणी केलेली आहे त्यातील समवर्ती सूचीतील काही विषयांचा समावेश केलेला असल्यामुळे अशा विषयावर केंद्र व राज्य सरकारांना अधिकार असून केंद्राचे त्यावर वर्चस्व असल्यामुळे कायद्याचे एकीकरण झालेले दिसते. म्हणून एकेरी न्यायव्यवस्था निर्माण झाली. दुसरे असे की, येथील राज्यव्यवस्थाही केंद्राधीनच आहे. त्यामुळे राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी न्यायव्यवस्थेवर पडते. त्यामुळे एकेरी न्यायव्यवस्था निर्माण झालेली दिसते. तिसरे असे की, देशात फुटीरता वाढू नये, एकात्मकता टिकावी म्हणून एकेरी व्यवस्था स्वीकारण्यात आली आहे. एकेरी न्यायव्यवस्थेमुळे कायद्यासमोर समानता या तत्त्वानुसार देशात एकच न्यायमूल्य निर्माण करणे शक्य झाले. दुहेरी व्यवस्थेत हे शक्य नव्हते.

2. हक्क व घटनेचे रक्षण - लोकशाहीत हक्कांचे रक्षण फार महत्वाचे असते. भारतीय न्यायव्यवस्थेकडे घटना आणि हक्कांच्या रक्षणाबबत जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे असे स्वरूप टिकविणे शक्य झाले आहे. याचाच अर्थ असा की घटना व हक्क यांना राजकारणापासून दूर ठेवून त्यांच्या संरक्षणाची पूर्ण जबाबदारी न्यायाव्यवस्थेवर सोपविण्यात आली आहे.

3. अंमलबजावणीचा अधिकार - भारतीय न्यायव्यवस्थेचे अजून एक महत्वाचे वैशिष्ट्य असे की, राज्यघटनेच्या 32 **व्या कलमानुसार हक्क संरक्षणासाठी आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी आदेश काढण्याचा अधिकार न्यायालयांना देण्यात आला आहे. म्हणजेच हक्कांच्या व घटनेच्या रक्षणाची संपूर्ण जबाबदारी न्यायव्यवस्थेवर सोपविण्यात आली आहे. जगातील इतर घटनांत क्वचित असे आढळून येते.**

4. अंतिम न्यायालय - भारतीय न्यायव्यवस्थेकडे घटनात्मक आणि घटक राज्यांच्या बाबतीत दिवाणी आणि फौजदारी दाव्यातील खटल्यात अंतिम निर्णय देण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाकडे सोपविण्यात आले आहेत. फक्त राष्ट्रपतीकडे दयेचा अर्ज देता येतो.

5. निवृत्तीनंतर व्यवसायबंदी - यापूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे पदनिवृत्ती झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना खासगी वकिली करता येत नाही; पण निवृत्तीनंतर त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा उपयोग व्हावा म्हणून विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या त्यांच्या सोपविल्या जाऊ शकतात. विविध उपयोग आणि चौकशी समित्यांवर निवृत्त न्यायाधीशांची नेमणूक केली जाते. निवृत्तीनंतर व्यवसायबंदीमुळे न्यायाधीशांची आणि न्ययालयाची प्रतिष्ठा कायम राहते. न्यायाधीशांवर दबाव येत नाही. म्हणूनच निवृत्तीनंतर व्यवसाय बंदी घालणे हे न्यायव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

6. नेमणुका आणि खर्चासाठी कायदेमंडळावर अवलंबू नाही - सर्वोच्च न्यायालयातील न्यायधीशांच्या नेमणुका प्रत्यक्ष राष्ट्रपती करीत असतात. तत्पूर्वी सर्व प्रकारची छाननी करून घेतात. या कामात कायदेमंडळाचा हस्तक्षेप होत नाही. न्यायालयातील इतर नेमणुकासुध्दा सरन्यायधीय आपल्या नियमानुसार कार्यक्षमता पाहून करीत असतात. कार्यकारी मंडळातील इतर प्रशासकीय यंत्रणा त्यात हस्तक्षेप करीत नाही. न्यायाधीशांचे आणि इतर कर्मचारीवर्गाचे पगार संचित निधीतून होत असल्यामुळे पगारासाठी कायदेमंडळाकडे जाण्याची गरज नाही. त्या सर्वांचा परिणाम असा झाला की, आपली न्याययंत्रणा स्वतंत्र, अलिप्त, तटस्थ, नि:स्पृह बनली आहे.

7. न्यायालयीन निर्णयांवर टीका करता येत नाही - आपल्या न्यायव्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, न्यायालाने दिलेल्या कुठल्याही निर्णयावर कोणत्याही प्रकारची बौद्धिक टीका करता येत नाही. अशा प्रकारचे घटनात्मक बंधन निर्माण करण्यात आलेले आहे. इतकेच नव्हे तर तशी टीका जर कोणी केली तर तो न्ययालयाचा अपमान समजून त्या व्यक्तीला शिक्षा होईल, अशी तरतूद घटनेत करण्यात आली आहे. त्यामुळे न्यायालयाची प्रतिष्ठा वाढली आहे व न्यायालयाचे स्वातंत्र्य कायम राहण्यास मदत झाली आहे.

8. न्यायालयाचे स्वातंत्र्य - या वैशिष्ट्यांचा विचार पुढे येणारच आहे. एवढे मात्र निश्चित की, आमच्या घटनाकारांनी हेतुपुरस्सर न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. न्याय देताना कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळ यांच्या प्रभावाखाली किंवा दबावाखाली अथवा प्रलोभनाखाली न येता मुक्तपणे, निर्भीडपणे, नि:पक्षपातीपणाने त्यांना न्याय देता यावा अशी व्यवस्था करण्यात आली आहे. न्यायाधीशांचे आकर्षक पगार, पदभ्रष्ट करण्याची अवघड पद्धत, सुरक्षित कार्यकाल या सर्व बाबींतून न्यायालयाचे स्वातंत्र्य जोपासण्यात आले आहे.

या सर्व वैशिष्ट्यांचा परिणाम असा झाला की, न्या. केनिया म्हणतात त्याप्रमाणे शासन बदलले, तरी भारतीय न्यायालये निर्णयाच्या बाबतीत खंबीर राहून देशातील सत्तेच्या राजकारणापासून दूर राहिली आहेत हे सिध्द होते.

जनहित याचिका आणि न्यायालयाची सक्रियता
(Public Interest Litigation and Judicial Activism)

आपल्या देशात अलीकडच्या काळात न्यायव्यवस्थेची संबंधित Litigation म्हणजे 'जनहितयाचिका' हा शब्द आता सामान्य माणसापर्यंत पोचला आहे. न्यायव्यवस्थेसंबंधीची एक नवीन 'देणगी' असे म्हटले जाते. काही लोक 'उपशाखा' म्हणतात. भारताप्रमाणे अन्य देशातही ही

पद्धत रूढ झाली आहे. आपली मागणी असते. इतकेच नव्हे तर 356 **व्या कलमाचा गैरवापर झाला हेसुध्दा नयायालयाने सांगितले.**

हे सर्व गृहीत धरताना एखादी संस्था किंवा व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीवर किंवा संस्थेवर अन्याय तर करीत नाही ना किंवा एखाद्याची कृती व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण करणारी नाही ना हे पाहणे तितकेच महत्त्वाचे असते. समाजातील अज्ञानी लोकांना किंवा दुर्लक्षित व्यक्ती गटाला अशा अन्याय किंवा जुलमी कृतीला तोंड द्यावे लागते. ज्ञानाच्या किंवा माहितीच्या अभावी आपल्यावर अन्याय झाला हेही अनेकांना माहिती नसते. अज्ञान किंवा 'माहीत नाही' ही सबब सुध्दा कायद्यापुढे, न्यायालयापुढे टिकत नाही.एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाला तर न्यायालय, शासनसंस्था किंवा बाधित अन्यायग्रस्त व्यक्ती यांच्याऐवजी तिसरीच एखादी व्यक्ती किंवा संस्था त्या (Third Party) **बाधित व्यक्तीच्या बाजूने उभी राहते. त्याच्यावर झालेल्या अन्यायाविरूध्द दाद मागते. न्याय मागते. न्यायालयात अर्ज देते. या मागचा उद्देश चांगला असता तरी त्या माध्यमातून न्यायालये अधिक सक्रिय झाली आहेत. हा धोका लक्षात ठेवावा लागेल. लोकशाहीच्या यशासाठी न्यायव्यवस्थेने खंबीर असले पाहिजे असे मत न्या.एस.पी. भरूचा यांनी व्यक्त केले होते.**

जनहित याचिकेचा अर्थ – व्याख्या :

"… **बाधित किंवा अन्यायग्रस्त व्यक्तीच्या बाजूने न्याय मागणारा, त्याला अपेक्षित न्याय मिळवून देणारा, सहकारी तत्त्वांवर आधारलेला तिसरा पक्ष** (Third Party) **म्हणजे जनहित याचिका** (Public litigation) **होय."** **यासाठी न्यायालयाकडे जो अर्ज दाखल करावा लागतो त्याला किंवा या एकूण प्रक्रियेला याचिका** writ petition **असे म्हणतात.**

("… may be defined as litigation undertaken for the purpose of redressing public infury, enforcing public duty protecting social, collective and diffused rights and interests or vindicating public interest…")

न्या. व्ही.आर. कृष्णा अय्यर यांनी या जनहित याचिकेला Social Engineering **असे म्हटले आहे. 'वाचकांचे मनोगत' या सारख्या वृत्तपत्रातील सदरातून किंवा साध्या पोस्ट कार्डामार्फत अन्यायाची वाचा फोडता येते. त्यातील आशय लक्षात घेऊन न्यायालयाकडे जनहित याचिका** (writ petion) **दाखल करता येते.**

या संबंधी महत्त्वाची गोष्ट अशी की, अनेक प्रसंगी जी बाधित व्यक्ती असते ती स्वतंत्रपणे (अज्ञान, पैशाची कमतरता इत्यादी कारणामुळे) न्यायालयकडे धाव घेऊ शकत नाही आणि आपल्यावर झालेल्या अन्यायाचे निवारण करू शकत नाही. त्याचे हे काम एखाद्या संस्थेकडून सहकारी तत्त्वाकडून किंवा व्यक्तीकडून होत असते. दुसऱ्या भाषेत सांगायचे म्हणजे न्यायासाठी संबंधित बाधित व्यक्तीनेच न्यायालयात दाद मागावी असे नसून तिसऱ्याच व्यक्तीने किंवा संस्थेने व्यक्तिगत किंवा सामूहिकखर्चाने त्या प्रश्नावर न्यायालयाकडे दाद मागणारी ही प्रक्रिया आहे. म्हणून जनहित याचिका (Public Interest Litigation) **ही न्याय प्रक्रियेतील सवलतीच्या भूमिकेतूनन्यायासाठी करावयाची मदत असे म्हणता येईल.**

घटनात्मक स्वरूपाचे काही प्रश्न, वनीकरण, शुद्ध पिण्याचे पाणी प्रश्न, सार्वजनिक स्वच्छता, शैक्षणिक क्षेत्रातील बेकायदेशीर व्यवहार, स्वातंत्र्य अधिकाराशी निगडित प्रश्न, अन्याय,

निवडणुकीतील प्रश्न अशा अनेक प्रकारच्या प्रश्नांच्या संदर्भात जनहित याचिका दाखल करता येते.

सबळ पुराव्यानिशी सकृतदर्शनी एखादी याचिका स्वीकारणे योग्य वाटले तरच न्यायालय ती स्वीकारते. नसता फेटाळून लावतात. स्वीकारलेल्या याचिकेच्या संदर्भात पुढे न्यायालयीन प्रक्रिया सुरू होते.

जनहित याचिकेची काही वैशिष्ट्ये :

पाश्चिमात्य देशातील विशेषत: अमेरिकेतील लेखकांनी जनहित याचिकेची काही पुढील वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

1) **भूतकालीन घडामोडींच्या संदर्भातून एखाद्या आजच्या घटनेचे पाहण्याऐवजी आधुनिक काळातील प्रश्नांच्या संदर्भातून या प्रक्रियेकडे पाहावे लागते. याचा अर्थ असा की जुन्या चौकटीत आजच्या प्रश्नांची उत्तरे शोधता येत नाहीत.**
2) **जनहित याचिकेतील तो तिसरा पक्ष आणि न्याय व्यवस्था यांच्याकडून कायद्यांच्या व्यावहारिक बाजूला आकार देण्याचा प्रयत्न केला जातो.**
3) **तसेच एकूणच राजकीय व्यवस्था आणि समाजोपयोगी करावयाचे कायदे यांच्याक्डे तटस्थ भूमिकेतून आणि वस्तुनिष्ठ भूमिकेतून बघण्याचे बळ प्राप्त होते.**
4) **प्रचलित व्यवस्थेनुसार मागील चुकांच्या दुरूस्तीची व्याप्ती मर्यादित असते. जनहित याचिकेत अभिप्रेत असलेल्या तत्त्वानुसार व्यापक, दूरगामी, लवचिक असे जनहित लक्षात घेऊन न्यायालये योगय उपाययोजना सुचवितात.**
5) **न्यायालये आपला निर्णय शक्यतो लादित** (imposed) **नाही.**
6) **जनहित याचिकेच्या अर्जाचा निकाल लागला तरी न्यायालयाची भूमिका संपत नाही. बाधित व्यक्तीला न्याय मिळेपर्यंत प्रशासकीय यंत्रणेची प्रक्रिया चालू राहते.**
7) **जनहित याचिका दाखल झाल्यावर न्यायालयांची भूमिका सक्रिय राहते. निष्कार्षापर्यंत नेणारी असते. न्यायालये केवळ बघ्याची भूमिका घेत नाही.**
8) **जनहित याचिका दाखल करणाऱ्या व्यक्तीचा प्रयत्न व्यक्तिगत फायद्यासाठी नसतो. सार्वजनिक धोरणातील अंमलबजावणीतील दोष दाखविणे हा उद्देश असतो.**

वरील वैशिष्ट्ये सर्वसाधारणपणे वैश्विक असली तरी देशा-देशात त्यात काही प्रमाणात वेगळेपणा दिसून येतो. म्हणून भारताच्या संदर्भातून विचार केल्यास जनहित याचिकेच्या संबंधी पुढील वैशिष्ट्ये सांगितली जातात.

1) **एखादी जनहित याचिका दाखल झाल्यावर ती राजकीय प्रेरणेतून, व्यक्तिगत फायद्यासाठी, न्यायालयाचा वेळ घेण्यासाठी दाखल झाली नाही याची न्यायालये खात्री करू शकतात. याचा अर्थ याचिकेचा उद्देश 'सार्वजनिक हित' बघणे हाच आहे ना हे पाहतात.**
2) **प्रशासकीय कार्यवाही लांबविण्यासाठी याचिकेचा वापर कोणी धूर्त, कावेबाज व्यक्ती करीत आहे हे लक्षात आल्यावर ही याचिका विचारात घेतली जात नाही.**

3) **एखाद्या बाधित व्यक्तीच्या बाबतीत वर्तमानपत्राच्या बातमीच्या आधारे दाखल झालेल्या याचिकेचाही विचार न्यायालये करू शकतात.**
4) **सार्वजनिक हितसंबंध सुरक्षित ठेवणे हा याचिकाकर्त्याचा आणि न्यायालयाचा उद्देश असल्याचे दिसून येते.**
5) **आपल्या देशाच्या संदर्भातून विचार केल्यास या प्रक्रियेतून न्यायालयाची अवाजवी सक्रियता वाढत चालली आहे.**

जनहित याचिकेचे मूल्यमापन :

जनहित याचिका ही संकल्पना मुळातच गेल्या 10-15 **वर्षापासून प्रचलित होऊ लागली आहे. अनेकांना अद्याप या प्रक्रियेची माहिती सुध्दा नाही. काही विचारवंत या प्रक्रियेला विरोध करतात. काही विचारवंत त्याचे समर्थन करतात. या अशा जनहित याचिकेच्या माध्यमातून न्यायालयाची सक्रियता वाढत चालली यावरही उलट-सुलट चर्चा होत आहे. एकूणच विरोध आणि समर्थन या दोन्ही गोष्टीचा आपणास विचार करावा लागेल.**

विरोध :

1) **शासनसंस्थेतील खाते, विभाग यांच्या कामात न्यायालयाकडून जनहित याचिकेच्या माध्यमातून हस्तक्षेप होऊ शकतो. काही गोष्टी कार्यकारी मंडळाने तर काही विधिमंडळाने कराव्यात असे लिखित असताना त्यात न्यायालयाने आदेश द्यावेत हे सत्ता विभाजनाच्या सिध्दांताला बाधा आणणारे आहे, असे मत व्यक्त केले जाते.**
2) **ज्या गोष्टी खातेप्रमुख, मंत्रिमंडळ किंवा विधिमंडळाने करायच्या असतात; त्या न्यायालयांनी करायचे ठरविले तर त्यांच्या कामाची व्याप्ती वाढेल, कामाचा ताण वाढेल.**
3) **गुणवत्तेला बाधा येईल अशा काही गोष्टी याचिकेच्या नावाखाली न्यायालयाकडून होऊ लागल्या आहेत. हे अपेक्षित नाही. शिवाय प्रशासनात अडथळे निर्माण होतात.**
4) **न्यायालयाच्या अतिरिक्त हस्तक्षेपामुळे प्रशासकीय यंत्रणेवर ढवळाढवळ होते. त्यामुळे कल्याणकारी योजना कार्यान्वित करताना अडचणी येऊ शकतात. त्यांचा वेळ, शक्ती, पैसा न्यायलयात जाण्या-येण्यात खर्च होऊ शकतो.**
5) **बाधित व्यक्ती जोपर्यंत स्वत: लक्ष देत नाही तोपर्यंत न्यायालयांनी एखाद्या संस्थेच्या, सरकारच्या कामाचे वैधानिकता तपासण्यात लक्ष घालू नये असे अपेक्षित आहे. असे झाले तरच शासनातील समन्वय टिकून राहील.**
6) **सामाजिक न्ययासाठी जनहित याचिका एक माध्यम असते; असे जे चित्र उभे केले जाते ते सुसंगत नाही. कारण न्यायव्यवस्था समाज परिवर्तनाचे एकमेव साधन ठरू शकत नाही.**
7) **जनहित याचिकेच्या माध्यमातून न्यायालयाची सक्रियता वाढणे घातक आहे. परिणामी राजकीय व्यवस्थेतील इतर घटकांचे अवमूल्यन होऊ शकते. ही बाब अधिक गांभीर्याने घेतली पाहिजे.**

समर्थन :

1) **जनहित याचिका दाखल करणाऱ्या उद्देश स्वार्थी आहे का सार्वजनिक स्वरूपाचा आहे हे न्यायालयाकडून बघितले जाते. अर्जात वैधानिक, घटनात्मक मुद्दे आहेत का हेही पाहूनच याचिका विचारात घेतली जाते. तसे नसेल तर ती फेटाळली जाते. म्हणून त्याबद्दल उगीच निराधार भीती बाळगण्याचे कारण नाही.**
2) **एखादा धूर्त माणूस मुद्दाम प्रशासकीय कार्यवाही लांबविण्यासाठी याचिका दाखल करतो हे न्यायालयाच्या लक्षात येते. म्हणून त्याचा बाऊ करण्यात अर्थ नाही.**
3) **जनहित याचिकेतून समाजहित साधू शकते आणि त्यासाठी कायद्यांची चौकट मोडण्याची गरज नसते.**
4) **सामान्य माणसाचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी सरकारी यंत्रणा असते. त्यांना अधिक गतिमान करण्यासाठी जनहित याचिकांचा उपयोग होत असेल तर त्यांचे स्वागतच केले पाहिजे.**
5) **शासनातील इतर घटकांचे, त्यांच्या कार्याचे अवमूल्यन होते ही भीती निराधार आहे अशा याचिकेमुळे त्यांना स्वत:च्या चुका कळतात. परिणामी त्यांचा कारभार अधिक लोकाभिमुख होऊ शकतो. कल्याणकारी योजनांना पाठबळ मिळते आणि बाधित व्यक्तीच्या अधिकारांचे रक्षण होऊ शकते.**
6) **समाज परिवर्तनासाठी शिक्षण इतर साधने असली तरी शेवटी न्यायमंडळाचा बडगा उगारल्याशिवाय ते साध्य होत नाही असा अनुभव आहे.**
7) **अनेकवेळा प्रशासकीय यंत्रणा दुर्लक्ष करते. उदाहरणार्थ एकदा न्यायालयाने भ्रष्टाचारावर भाष्य करताना प्रत्येक कार्यालयात भ्रष्टाचाराचे दर का लावित नाहीत असा खोचक प्रश्न विचारला होता. भ्रष्टाचारावर आळा घाला हा न्यायालयाचा उद्देश होता.**

तात्पर्य, जनहित याचिकेतून स्वातंत्र्याचे रक्षण होऊ शकते. कल्याणकारी योजना राबविताना आलेल्या अडचणी न्यायालयीन हस्तक्षेपामुळे दूर होत असतात. सत्ता विभाजनाच्या सिद्धांताला बाधा आणणे हा अशा याचिकांचा उद्देश नसून त्यांच्या चुका सुधारण्याची संधी देणे हा आहे. वारंवार कोर्टाच्या पायऱ्या झिजण्याचे प्रसंग सामान्यांवर येऊ नये म्हणून जनहित याचिकांचा उपयोग होतो. लोकांना न्याय मिळवून देणारी ही यंत्रणा आहे. या दृष्टिकोनातून जनहित याचिकेकडे पाहिले जाते तर तिची उपयुक्तता समजून घेईल.

न्यायालयाची सक्रियता :

जनहित याचिकांचा जसा विचार होऊ लागला त्या प्रमाणात न्यायालयाची सक्रियता असा नवा शब्द प्रयोग होऊ लागला. न्यायालये विधिमंडळांच्या अधिकारात किंवा प्रशासनात हस्तक्षे, लुडबूड करू लागली आहेत. अशीही आरोळी मारली जात आहे. या सर्व चर्चेला न्यायालयाची सक्रियता (Judicial Activism) **असे म्हणतात.**

न्यायालयीन सक्रियता आणि जनहितयाचिका या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. न्याय आणि संधीची समानता हे राज्यघटनेचे उद्दिष्ट आहेच. या गोष्टी प्रशासन चालविणाऱ्यांनी कराव्यात; परंतु ते जेव्हा अयशस्वी होतात किंवा ते त्याकडे डोळेझाक करतात तेव्हा न्ययालये लक्ष घालतात. सामान्य लोकांना न्याय मिळवून देणे ही त्या मागची भूमिका असते.

आधुनिक काळातील कोणत्याही देशाच्या लोकशाहीत कार्यकारी मंडळ, विधिमंडळ आणि न्यायमंडळ असे विभाजन झालेले असते. एका शाखेवर दुसऱ्या दोन शाखांचे नियंत्रण असते. समाजाच्या कल्याणाचा विचार करून मंत्रिमंडळ धोरण ठरविते आणि कायदेमंडळ त्यास पाठिंबा देते. ही सर्व प्रक्रिया घटनात्मक तरतुदीनुसार चालू असते. ही प्रक्रिया चालू असताना योग्य-अयोग्य, कायदेशीर-बेकायदेशीर असा निर्णय न्यायालयांनी घ्यावयाचा असतो.

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पिढीतल्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या राज्यकर्त्यांमुळे 1970 **पर्यंत न्यायालयांना मध्यस्थी किंवा हस्तक्षेप करण्याची गरज पडली नाही; परंतु पुढे ही परंपरा हळूहळू खंडित होऊ लागली.**

कायद्यांचा केवळ अर्थ न सांगता अमुक एखाद्या कायद्याने व्यक्तीवर अन्याय होतो, तमक्याने होत नाही हे न्यायालयांवर सांगण्याची वेळ आली. राजकीय व्यवस्थेतील कोणत्या विभागाची कोणती जबाबदारी असते, दारिद्र्यांशी संबंधित, सामाजिक समतेच्या संबंधी काय करायला हवे होते, अद्याप का केले नाही, व्यक्तीवर होत असलेल्या अन्याय कसा दूर करावा हे न्यायालये सांगू लागली. शिक्षण, भ्रष्टाचार, पर्यावरण, पाणी वाटप, अधिकारांची पायमल्ली, स्वातंत्र्याची होत असलेली मुस्कटदाबी, घटनाबाह्य होणारे कायदे, स्त्रियांचा छळ, बालकांचे कुपोषण, तुरूंगातील कैद्यांचा होत असलेला छळ इत्यादी प्रश्न सोडविण्यात किंवा त्याकडे लक्ष देण्यास कोणालाच वेळ मिळत नाही. त्यातून पिडित झालेल्यांना कोणी जणू वाली नाही अशी व्यवस्था होऊ लागली. वेठबिगार, बालमजुरांचा प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न इत्यादी कितीतरी प्रश्न सोडवायचे होते.

अज्ञान आणि अठराविश्व दारिद्रय यामुळे अन्यायग्रस्त व्यक्तीला न्यायालयाकडे जाण्याची संधी अशक्य झाली होती आणि आजही आहे. या पार्श्वभूमीवर कोणीतरी (Third Party) **कोणासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावू लागले व न्यायाची प्रतीक्षा करू लागले. न्यायालये आपल्या मर्यादा सांभाळून जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करू लागली. न्यायालयांची सक्रियता म्हणतात ती या संपूर्ण प्रक्रियेला.**

न्यायालयीन सक्रियतेमुळे विधिमंडळ किंवा कार्यकारी मंडळ यांचे अधिकारी कमी झाले नाहीत किंवा त्यावर मर्यादाही आल्या नाहीत. खरे सांगायचे तर न्यायलयांनी त्यांना जागरूक आणि सक्रिय केले.

स्वातंत्र्य रक्षणाची आणि सामाजिक न्यायाची लोक अपेक्षा करू लागले. न्यायालये त्यातून योग्य आणि व्यावहारिक मार्ग काढू लागले. त्यातून न्यायालयांची सक्रियता वाढत गेली. कायदेमंडहाची आणि प्रशासकीय यंत्रणेची 'हम करे सो कायदा' ही प्रवृत्ती जशी वाढत गेली तशी न्यायालयांची जागरूकता वाढत गेली. न्यायालये घटनेच्या बाजूने उभी राहू लागली. सामान्य लोकांची 'कैवारी' बनली. घटनात्मकदृष्ट्या हे चूक नव्हते.

न्यायालयाच्या सक्रियतेसाठी दोन कारणे सांगितली जातात. ते असे –

1. **सामान्य लोकांचा न्यायालयावरील विश्वास वाढू लागला.**

2. **राज्यघटनेच्या कलम** 141 **मध्ये लिहिल्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने केलेले नियम किंवा मार्गदर्शन कनिष्ठ न्यायालये आणि इतरांवर बंधनकाकर असतात, हे समजू लागले.**

काही दोष :

1. **काही वेळेला सक्रियता दाखविताना कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळाच्या कार्यक्षेत्रात गरजेपेक्षा जास्त हस्तक्षेप होत असतो किंवा होऊ शकतो.**
2. **अशा हस्तक्षेपामुळे कार्यकारी मंडळ, कायदेमंडळाचे महत्तव तर कमी होईल, शिवाय सत्ता समतोल बिघडून जाईल. लोकशाही यंत्रणेसाठी ते घातक ठरेल.**
3. **न्यायालये तरी कोठे 'स्वच्छ' राहिली आहेत? न्यायाधीशांच्या भ्रष्टाचारांची लक्तरे वेशीवर टांगली जात आहेत. प्रशासकीय यंत्रणेचा बेजबाबदारपणा आणि न्याय प्रक्रियेतील वाढत जाणारे पैशाचे महत्त्व यामुळे लोकांचा कोंडमारा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातून आलेल्या नैराश्यातून संप, मोर्चे, आत्महत्या, जाळपोळ, आंदोलने होऊ शकतात.**
4. **न्यायालयातील वेळकाढूपणाला लोक कंटाळले आहेत. 'कोर्टाची पायरी नको रे...' असे म्हणू लागले आहेत. त्यातून लोकअदालत, फिरती न्यायालये, कौटुंबिक न्यायालये स्थापन होऊ लागली आणि लोक त्यांच्यामार्फत न्याय मिळवू लागली आहेत.**
5. **न्यायाधीशांचे एखाद्या याचिकेच्या संबंधी एकमत होत नाही. परस्पर विरोधी मते मांडली जातात.**

महत्त्व :

वरील दोष मान्य करूनही न्यायालयाची सक्रियता आणि जनहित याचिका यांचे योगदान आणि महत्त्व नाकारता येत नाही. कारण –

1. **अन्यायग्रस्त व्यक्ती शेवटही याचिकेद्वारे प्रयत्न करते. न्यायालये त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करते. व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण करते.**
2. **एखाद्या संस्थेचा, शासकीय यंत्रणांचा बेजबाबदारपणा उजेडात आणण्याचा प्रयत्न न्यायालये करीत असतात. हे फार मोठे योगदान आहे. एक-दोन घटनामुळे न्यायालयांना दोष देता येत नाही.**
3. **समाजातील कमकुवत घटक, अज्ञानी, गरीब लोकांना संरक्षण आणि सोप्या पद्धतीने आणि कमी वेळेत आणि कमी पैशात न्याय मिळण्याची सोय होते. परिणामी लोकशाही यंत्रणेवरचा त्यांचा विश्वास दृढ होतो.**

तात्पर्य, जनहित याचिकेच्या प्रक्रियेने भारतीय न्याय व्यवस्थेला अभिमानाच्या सर्वोच्च शिखरावर नेऊ ठेवले आहे.

सारांश :

भारताने लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला आहे. लोकशाहीत नागरी स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी न्यायालये स्वतंत्र असावी लागतात. न्यायालये स्वतंत्र असणे म्हणजे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यांच्या प्रभावापासून ती मुक्त असणे होय. याच अर्थ असा की, न्यायदान करीत

असताना कोणाच्याही प्रलोभनाला किंवा धाकधपटशाला बळी न पडता जेव्हा स्वतंत्र बुध्दीने न्यायाधीश न्यायदान करतात तेव्हा न्यायालयाचे स्वातंत्र्य निर्माण होत असते. राज्यघटनेत त्यादृष्टीने काही तरतुदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. त्यावरून न्यायालयाचे स्वातंत्र्य भारतीय राज्यघटनेचे प्रमुख वैशिष्ट्य बनले आहे. जनहित याचिका आणि न्यायालयीन सक्रियेच्या माध्यमातुन भारतीय न्यायव्यवस्थेने गेल्या 75 **वर्षामध्ये अनेक सकारात्मक निर्णय घेतल्याचे दिसून येते. तसेच सरकारच्या चुकीच्या निर्णयावर आक्षेप घेतलेले दिसून येतात. न्यायालयीन सक्रियेतेमुळे समाज व जनतेच्या हिताचे निर्णय न्यायव्यवस्थेच्या माध्यमातुन झालेले दिसून येतात.**

संदर्भ :

1) **भारतीय शासन आणि राजकारण, प्रा.बी.बी. पाटील, फडके प्रकाशन, कोल्हापुर.**
2) **भारतीय राज्यघटना, स्वरूप व राजकारण, प्राची घांगरेकर, मंगेश प्रकाशन, नागपुर.**
3) **भारतीय राजकीय व्यवस्था, डॉ. भा.ल. भुळे.**
4) **भारताचे शासन आणि राजकारण, डॉ. सुधाकर जोशी, विद्याबुक पब्लिकेशन,छ. संभाजीनगर.**
5) **राजकीय सिद्धांत आणि भारतीय राजकीय व्यवस्था, प्रा.बी.बी. पाटील, फडके प्रकाशन, कोल्हापुर.**